**हे नूतन वर्ष आपणा सर्वांस आरोग्यसंपन्नतेचे, सर्वांगीण प्रगतीचे व सुखानंदसंतोषाचे जावो !**

# राशिभविष्य - जानेवारी, २०१८.

**दादा दामले** (dadadamle@gmail.com)

==================================================

**(१) मेष -** या राशीच्या मंडळींचा वर्तमान स्वभाव अत्यंत अस्थिर, चंचल, लहरी अशा प्रकारचा झाला असावा, असे प्रकर्षाने जाणवते. त्यामुळे कोणी केलेला उपदेश किंवा दाखवलेला धाक असह्य होत असला पाहिजे. अपमानास्पद वाटत असावे. पण त्यामुळे येणाऱ्या मैत्रीच्या , प्रेमाच्या संबंधात बाधा येऊ नये म्हणून त्यांनी मनावर संयम ठेवून व सहनशील बनून काळ व्यतीत करावा, असे आग्रहाने सांगावेसे वाटते. त्यामुळे स्वत:ला मनस्ताप होणार नाही. तसेच या राशीच्या लहान मुलांना तर त्यांच्या पालकांनी विशेष जपावे, असे सांगावेसे वाटते. असे असले तरी या राशीच्या शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यमग्न असणाऱ्या मंडळींना मात्र काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. पण या राशीच्या अन्य नोकरदार मंडळींना मात्र घरीदारी वडील मंडळींचा विरोधच सहन करावा लागेल. इच्छा आकांक्षा अपूर्ण राहतील. मानसिक ताण असह्य होईल. त्यामुळे भावनेच्या भरात काही जण भरकटत जाणेही संभवते. जपा. या राशीच्या काही युवकांना हातची नोकरी सोडून नवे काही करण्याची उर्मी येईल. पण त्यांनी तसे करू नये. आहे ती नोकरीच करावी. चतुर्थ स्थानी असलेल्या राहूमुळे विविध कारणांनी कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. जपा. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी मतभेद, संशय अशापैकी कारणांनी भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. पण गुरु ग्रहामुळे परिस्थिती फारशी बिघडणार नाही. उलट मैत्रीचे , प्रेमाचे संबंध दृढ होतील. नवे स्नेहसंबंध जुळून येतील. विवाहेच्छूना विवाहयोग संभवतो. काहींना धनलाभ होणेही शक्य आहे. मात्र वैवाहिक जीवनात जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे वा अन्य कारणाने अपेक्षित वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. पण शुक्र ग्रहामुळे मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. काहींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. आर्थिक व्यवहार सावधानतेने करा. वाममार्गी मित्रांपासून दूर राहा. श्रद्धेने श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना करा.

**(२) वृषभ -** या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळींची मनस्थिती उत्साही, हरहुन्नरी, मोठे मन असणारी अशी राहण्याची दाट शक्यता आहे. हातून कर्तृत्व घडेल. पण काही कारणाने बंधुसुखात बाधा येणे संभवते. यांत्रिक तांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना, तसेच बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना, द्रव पदार्थ व्यापार असणाराना आणि मानसिक आजारतज्ञाना या महिन्याचा संपूर्ण काळ
प्रगतिकारक, यशदायक व लाभदायक असल्याचा अनुभव येईल. अन्य नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल होईल. उत्तरार्ध मनस्ताप देणारा असल्याचाच अनुभव येईल. कुसंगतीची बाधा होणे संभवते. जपा. अष्टम स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे आर्थिक चिंता, मनस्ताप देणाऱ्या घटना, अनारोग्य अशापैकी घटना घडू शकतील. जपा. काही जणांकडून ढोंगी आचरण होणे संभवते. पण त्यामुळे स्वत:विषयीचे इतरांचे मत बदलणे संभवते. जपा. अष्टम स्थानी असलेल्या शुक्र ग्रहामुळे काही लाभदायक घटना घडणे शक्य आहे. काहींना भूमिलाभ संभवतो तर काहींकडून स्वत:चे कर्तृत्व सिद्ध होईल. पण या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या विक्षिप्त हर्षल ग्रहामुळे काही जणांना आर्थिक समस्या त्रस्त करतील, तर काहींना नको त्या वाईट प्रसंगाला तोंड

द्यावे लागेल. इतकेच नव्हे तर काहींना जिवावरच्या प्रसंगाशी मुकाबला करावा लागण्याची शक्यताही दिसते. काहींवर बेअब्रू होण्याची वेळ येईल तर काहींवर अकारण शत्रुत्वाला तोंड देण्याचा प्रसंग उद्भवेल. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात मंगळ ग्रह या राशीच्या सप्तम स्थानी आल्यावर जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे किंवा दोघांतील मतभेदामुळे वैवाहिक सुखात बाधा येणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल व मन:शांती लाभेल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(३) मिथुन -** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही असेच म्हणावे लागेल. कौटुंबिक जीवनात कलह, भांडणे होणे, आर्थिक समस्या व संततिसमस्या त्रस्त करणे, प्रापंचिक व वैवाहिक जीवनातील सुखात बाधा पडणे अशापैकी घटनांनी त्रस्त व्हाल. सतत सावधानतेने आचरण करा. अपघात भय आहे. तसेच काही मंडळींना रक्तविकाराचा तर काहींना त्वचा रोगाचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. काही मंडळीना मुख दंत रोगाचा आजार होणेही संभवते. जपा. संततीपैकी काही मुलांचे अनारोग्य तर काहींचे विक्षिप्त आचरण, मनाविरुद्ध वागणे, यांमुळे असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या सर्वच विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. पण विशेष करून वैद्यकीय आणि यांत्रिकतांत्रिक शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अधिक अनुकुल होईल. महिन्याच्या उत्तरार्धात मंगळ ग्रह या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर काही मंडळींना अपप्रचाराचा त्रास सहन करावा लागेल. काहींना रक्तविकाराचा तर काहींना हृदयविकाराचा आजार त्रस्त करील. जपा. तसेच चोरी होणे, आर्थिक नुकसान होणेही संभवते. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळींना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. पण या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या शनि ग्रहामुळे स्वत:चे व जीवनसाथीचे अनारोग्य चिंतेचा विषय होईल. जपा. काही मंडळींना कुसंगतीची बाधा होणेही संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी असलेला नेपच्यून ग्रह आध्यात्मिक उपासनेस अनुकुल असून उपासने द्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. काही मंडळीना सूचक स्वप्ने पडतील, तर काहींना परदेशगमनाची संधी मिळेल.
पण या राशीच्या लाभस्थानी असलेल्या हर्शलमुळे काही मंडळीना अनपेक्षितपणे अर्थलाभ होईल; तर काही मंडळीचे मित्रांशी भांडण तंटे होण्याची दाट शक्यता आहे. श्रद्धा असेल तर शिवोपासना मन:शांती देईल.

**(४) कर्क -** कारण असो वा नसो, घरीदारी, सर्व ठिकाणी या राशीच्या मंडळींचे सतत अपमान होत असावेत व त्यामुळे सूड भावना निर्माण होत असावी , असे वाटते. असे घडणे वातविकारांचा जोर वाढल्यामुळेही होत असावे, असे वाटते. कौटुंबिक जीवनात भांडणतंटे, असमाधानकारक घटना घडणे शक्य असले तरी मंगळासह गुरु ग्रह असल्याने परिस्थिती फारशी बिघडणार नाही. उलट राहत्या जागेसंबंधी किंवा स्थावर संबंधी काही समस्या असेल तर ती सहज सुटू शकेल. पण नातेवाईक मंडळींपैकी कोणाचा असह्य त्रास सहन करावा लागण्याची शक्यता मात्र दिसते. या महिन्यात या राशीच्या मंडळींना संततिविषयक समस्या त्रस्त करण्याची दाट शक्यता आहे. काही मुलांचे अनारोग्य , काहींची आचरणविषयक समस्या त्रस्त करतील. महिन्याच्या उत्तरार्धात स्वत:च्या अनारोग्याची चिंता त्रस्त करील. जपा. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी दगदग करू नये. नोकरीत

वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागेल. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती सुधारेल. शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. तसेच लोखंड, कोळसा व्यापार असणारांनाही काळ लाभदायक होईल. सप्तम स्थानी असलेल्या केतूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच काही कोर्ट प्रकरणे असतील तर त्यात अपयश येणे संभवते. त्यामुळे मनस्थिती अस्वस्थ राहील. बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. तसेच जालप्रवासही करू नका. कारण विषभय व जलभय आहे. एकंदरीत विचार करता या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात मनावर व विचारशक्तीवर संयम ठेवून आणि सहनशील बनून आचरण करणेच सुखाचे होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(५) सिंह -** महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या मंडळींची मनस्थिती अतिशय धीट, शक्तिशाली, महत्वाकांक्षी अशी राहील. हातून काही कर्तबगारीचे काम घडू शकेल. काहींना प्रवासाचे योग येतील. या राशीच्या लेखकांचे लेखन ग्रंथरूपाने प्रकाशित होईल. पण भावंडापैकी कोणाकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. कौटुंबिक जीवनात विविध कारणांनी भांडण तंटे, वाद, असमाधानकारक घटना घडणे, अविचाराने खर्च होणे संभवते. स्वत:च्या अनारोग्याची चिंता त्रस्त करील. काही मंडळींना राहत्या जागेसंबंधीची चिंता त्रस्त करील; तर काहींना स्थावर संबंधीची चिंता त्रस्त करील. जपा. पण बुध ग्रहाच्या अनुकुलतेने दिलासा मिळेल. मित्रसुख लाभेल. तसेच शुक्राच्या अनुकुलतेने काही सुखसमाधान देणाऱ्या घटना घडतील. या राशीच्या ज्या मंडळींची शेतीवाडी आहे अशांना शेतीवाडीपासून खूप लाभ होईल. पण महिन्याच्या पूर्वार्धापेक्षा उत्तरार्धात अधिक मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. महिन्याच्या पूर्वार्धात संततिविषयक समस्या त्रस्त करील; तर महिन्याच्या उत्तरार्धात नोकरदार मंडळींना वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत विविध कारणांनी अडथळे निर्माण होतील. केतूच्या अनुकुलतेने व्यवसायात प्रगती होईल. पण सप्तम स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे व व्ययस्थानी असलेल्या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना समूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील, तर काहींना परदेशवारीची संधी मिळेल. श्रद्धा असेल तर कुलदैवताची आराधना व जप यांमुळे मन:शांती लाभेल.

**(६) कन्या -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल, प्रगतिकारक व लाभदाय होईल. महत्त्वाकांक्षा वाढेल. स्वकर्तृत्व सिद्ध करण्यास काळ अनुकुल आहे. मित्रसुख मिळेल. मात्र त्यासाठी शारीरिक-मानसिक आरोग्य उत्तम राखता आले पाहिजे. कारण या काळात शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकाराचा एखादा आजार त्रस्त करीलसे दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती बदलेल. त्यामुळे कोणतीही अपेक्षित गोष्ट घडण्यात दिरंगाई होणे संभवते. शिवाय कौटुंबिक सुखाचे दृष्टीने सुद्धा महिन्याचा उत्तरार्ध प्रतिकुल असणे संभवते. कारण असो, नसो गैरसमजाने कुटुंबात वाद , भांडणे होणे संभवते. त्यामुळे नातेसंबंधात वितुष्ट येणे संभवते. काहींना राहत्या जागेची समस्या त्रस्त करील, तर काहींना स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करील. जपा. त्यामुळे काही मंडळीना अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेल. काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करील. जपा. अवास्तव खर्च होणेही संभवते. या राशीच्या मंडळींच्या

संततिसुखात विविध कारणांनी बाधा येणे संभवते. तसेच या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे येणे संभवते. आर्थिक फसवणूक होणे संभवते. काल्पनिक चिंता त्रस्त करतील. काहीना नैराश्य येईल तर काहींना उगीचच आपल्याला कसला तरी आजार झाला असल्याची भावना त्रस्त करील. वाहन सावधानतेने चालवा. रस्त्याने विचाराच्या तंद्रीत चालू नका. कारण अपघात भय आहे. जपा. अधिकारामुळे ज्यांना वाममार्ग धन सहज मिळणे शक्य आहे , अशांनी तो मोह कटाक्षाने टाळावाच. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. जपा. तसेच ज्यांना जुगाराचा नाद आहे अशांनीही तो नाद सोडावा. नुकसानच होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(७) तुळा -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा उत्तरार्धच अधिक प्रमाणात अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. विशेष करून बौद्धिक कार्यक्षेत्र असणाराना या महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. पण महिन्याच्या पूर्वार्धात जिद्द कराल तर केवळ श्रम व दगदग होईल. त्यामुळे अनारोग्य होणेही संभवते. जपा. चिकित्सक बौद्धिक संशोधनात्मक कार्यक्षेत्र, साहित्यिक लेखन कार्यक्षेत्र असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात रवि ग्रह व उत्तरार्धात बुध-मंगळ ग्रह प्रतिकुल असल्यामुळे मनाविरुद्ध घटना घडणे संभवते. त्यामुळे संताप येईल व शारीरिक उष्णता भडकून उष्णताविकाराचा आजार होणे संभवते. विशेष करून डोळ्याचे अनारोग्य होणे संभवते. काहींना घशाचे आजार, किंवा दात -दाढा दुखण्याचा आजार होणे संभवते. शिवाय आर्थिक समस्याही त्रस्त करील. देणे द्यावेच लागेल; पण येणे मात्र केव्हा येईल ते सांगता येणार नाही. अशा परिस्थितीत शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेने कौटुंबिक जीवनात मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. काहींना भूमिलाभ तर काहींना मानाचे स्थान व प्रतिष्ठा प्राप्त होईल. काहींना मनपसंत उत्तम नोकरी लागेल तर काहींना नवे आवडते कार्यक्षेत्र मिळेल. पण भावंडविषयक एखादी चिंता त्रस्त करील, असे वाटते. सुखस्थानी असलेल्या केतू मुळे कोणाशी फारसे पटणार नाही. शिवाय एखादी चिंता त्रस्त करील. विषभय असल्याने बाहेरचे उघड्यावरचे पदार्थ खाऊ नका. मनस्थिती अत्यंत भावनाशील झाल्यास आध्यात्मिक उपासनेस अनुकुल होईल व अशा उपासनेद्वारे मन:शांती प्राप्त होईल. जीवनसाथीचे विक्षिप्त, लहरी आचरण, दोघांतील मतभेद, वाद अशांमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येईल. जपा. तसेच भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी काहीही कारणाने भागीदारीत बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. दशम स्थानी असलेल्या राहूमुळे शासकीय , निम-शासकीय नोकरदार मंडळींना बढती, अधिकार पद असे काही मिळू शकेल. काहींचा सन्मान होणेही संभवते. कुलदैवताची उपासना अनुकुल होईल.

**(८) वृश्चिक -** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ फारसा अनुकुल नाही असेच म्हणावे लागेल. शिवाय शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ आहे. याचा अर्थ इतकाच की सतत मनावर व विचारशक्तीवर नियंत्रण ठेवून व अत्यंत सहनशील बनून तसेच नम्रतेचे आचरण करूनच प्रतिकुल काळाशी मुकाबला करा. या राशीच्या मंडळींचा स्वभाव संतापी आणि अहंकारी असतो. त्यामुळे त्यांच्या अहंकाराला धक्का बसला तर त्यांच्या मनावरील ताबा सुटून त्यांच्या हातून नको ते घडण्याची शक्यता असते. कधी कधी कुटुंबात अनिष्ट घटनाही घडतात. जपा. त्यामुळे

शारीरिक-मानसिक आरोग्य बिघडण्याची दाट शक्यता असते. रवि-मंगळ हे उष्ण प्रकृतीचे दादा ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे आर्थिक चिंता, जुन्या दबलेल्या प्रकरणाचा असह्य त्रास सहन करावा लागण्याची शक्यता आहे. अर्थप्राप्तीसाठी खूप कष्ट परिश्रम करावे लागतील. त्यामुळे अनारोग्य होणे संभवते. रक्तदाब व हृदयविकार असणारांनी तर विशेष काळजी घेतली पाहिजे. नोकरदार मंडळींना महिन्याचा उत्तरार्ध मनस्ताप देणारा असाच असणार आहे. मात्र व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकाकडूनच अधिक अर्थलाभ होईल. कोणत्याही समस्येबाबत किंवा संशोधानाबाबत अति विचार करू नका. नपेक्षा असह्य डोकेदुखीचा त्रास सहन करावा लागेल. काही मंडळींना मेंदूविकाराचा त्रास त्रस्त करील. जपा. भाग्यस्थानी असलेल्या कर्क राशीतील राहूमुळे कधी अनुकुल तर कधी प्रतिकुल प्रसंगाला तोंड द्यावे लागेल. खूप कष्ट परिश्रम करावे लागतील. मधून मधून नैराश्य येणेही संभवते. अशा प्रतिकुल काळात आध्यात्मिक उपासनाच मन खंबीर ठेवू शकते. म्हणून श्रद्धेने श्रीगणेश उपासना आणि श्रीहनुमान उपासना करा. दररोज नियमितपणे हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात आपल्या शारीरिक-मानसिक आरोग्याकडे लक्ष देणे आवश्यक होईल. सतत मनाविरुद्ध घटना घडणे संभवते. तसेच मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. जपा. काही जुनी दबलेली प्रकरणे असतील तर ती पुन्हा उकरली जातील व त्यांचा असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. गैरसमजुतीने वाद, भांडणे होणे शक्य दिसते. त्यामुळे थकवा येईल. रक्तदाब, हृदयविकार असे आजार असणारांनी तर मनावर संयम ठेवून व सहनशील बनून नामस्मरणात काळ व्यतीत करावा. आर्थिक चिंता त्रस्त करतील. कौटुंबिक जीवनात कोणा प्रिय
जनांचे स्थलांतर झाल्यास मन बेचैन, अस्वस्थ होईल. स्वत:च्या व जीवनसाथीच्या अनारोग्याकडे लक्ष द्यावे लागेल. नियोजित कार्यात अडथळे येणे संभवते. काही मंडळींना कुसंगतीचा परिणाम भोगावा लागेल. अशा प्रतिकुल काळातही काही मंडळींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील. तसेच गूढ संशोधन व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना, बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना व साहित्यिकाना तसेच सर्व प्रकारच्या कलाकारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. मात्र त्यासाठी शारीरिक-मानसिक आरोग्य उत्तम असले पाहिजे. सर्व नोकरदार मंडळीना मात्र मनावर संयम ठेवून व सहनशील बनूनच काळ व्यतीत करावा लागेल. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या राहूमुळे मनस्ताप व पोटविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. अशाही प्रतिकुल काळात गुरु-शुक्राच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. या राशीच्या काही भाग्यवान मंडळींना मौल्यवान वस्तूचा लाभ होणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना या महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. म्हणून त्यांनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. कारण महिन्याचा उत्तरार्ध प्रतिकुल परिस्थिती निर्माण करणारा असल्याचाच अनुभव येईल. वैद्यकीय व्यवसाय, औषध विक्रेते, यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय, तसेच बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारानाही संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व

लाभदायक होईल. मन प्रसन्न राहील. पण वाहन सावधानतेने चालवा. अपघात भय आहे. आर्थिक व्यवहार सावधानतेने व विचारपूर्वक करा. काही जणांना अनपेक्षितपणे येणाऱ्या आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडण्याची चिंता त्रस्त करील. काहींच्या आर्थिक व्यवहारात घोटाळे होणेही संभवते. जपा. अशा घोटाळ्यामुळे काहींना कोर्टकचेरीचे लचांड मागे लागण्याची शक्यता दिसते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी असलेले रवि-शनि प्रतिकुल होणार असल्याने मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. त्यामुळे मन अस्वस्थ राहील व काहींना गहरे नैराश्य येणेही संभवते. काहींचे शारीरिक आरोग्य बिघडणेही संभवते. मनस्थिती चंचल, अस्वस्थ राहिल्यास घरीदारी कोणाशी पटणार नाही, सुख समाधान लाभणार नाही व सतत तक्रारखोर स्वभाव राहील. आहे त्या परिस्थितीत सुख लाभणार नाही. वास्तुसुखही मिळणार नाही. जपा. सप्तम स्थानी असलेल्या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच काहींच्या मनात कपटी विचार प्रबल होतील. ते घात करतील. जपा. ज्यांना वाममार्ग धन सहज मिळणे शक्य आहे अशांनी कटाक्षाने त्या गोष्टीचा मोह टाळावा. होत्याचे नव्हते होण्यास वेळ लागणार नाही. शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्याने सतत विचारपूर्वक, मोह टाळून व सावधानतेने आचरण करणेच सुखाचे होईल. बुध-गुरु-शुक्राच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. श्रद्धा असेल तर श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल. दररोज नियमितपणे " हनुमानचालिसा" स्तोत्राचे पठण करा.

**(११) कुंभ -** सध्या या राशीच्या मंडळींचे मन अतिशय कोमल झाले असल्यास मानसिक संवेदनाही अति शीघ्र होत असतील. त्यामुळे थोडेही काही मनाविरुद्ध घडले तर लगेच मानसिक उदासीनता येऊन गहरे नैराश्य येत असावे, असे वाटते. या राशीच्या व्ययस्थानी असलेला केतू शत्रुत्व निर्माण करणारा आहे. पण याच केतूमुळे शक्ती प्राप्त होते व इतर लाभही होतात. या केतूमुळे खर्च वाढतात व आर्थिक चिंता निर्माण होते. जपा. शिवाय अनारोग्य होणेही संभवते. या राशीच्या मंडळींना सध्या उच्च प्रकारची बौद्धिक शक्ती, आकलनशक्ती व स्मरणशक्ती प्राप्त होणे संभवते. तसे असेल तर चौकस बुद्धिमत्तेमुळे शास्त्रीय संशोधनातील कठीण समस्याही ही मंडळी सहज सोडवू शकतील. या राशीच्या षष्ठ स्थानी असलेल्या राहूमुळे व्यावसायिकांच्या व्यवसायात अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच चोरी होणेही संभवते. जपा. पण या राहूमुळे सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राहील व धनलाभही होईल. शेती व्यवसाय असणारांना हा राहू अनुकुल व लाभदायक होईल. शक्यतो प्रवास करू नका. कारण प्रवासात मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. अध्यात्माची ओढ असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती साधणे शक्य होईल. काही भाग्यवान मंडळींना सूचक स्वप्ने पडतील; तर काहींना परदेशवारीची संधी मिळेल. या राशीच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा सर्व काळ अनुकुल असून लाभदायक होईल. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीपैकी काहीना बढती, काहींना मानाचे स्थान तर काहींना प्रतिष्ठा प्राप्त होईल. इच्छा आकांक्षा पूर्ण होतील. मोठ्या अधिकारी मंडळींच्या ओळखी होतील व त्यामुळे लाभदायक घटना घडतील. महिन्याचा उत्तरार्ध वैद्यकीय व्यवसाय, यांत्रिकतांत्रिक व्यवसाय असणारांना अनुकुल, प्रागतिकारक व लाभदायक होईल. काहींना नवे मित्र मिळतील तर काहींना धनलाभ होईल. सुखसमाधान लाभेल. मात्र दशम स्थानी असलेल्या मंगळाच्या राशीतील शुक्रामुळे काही अडचणी व मनस्ताप देणाऱ्या घटना घडणेही संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगणेश उपासना व श्रीहनुमान उपासना मन:शांती देईल.

**(१२) मीन -** या राशीच्या मंडळींची वर्तमान मनस्थिती अत्यंत चंचल व अस्थिर अशी झाली असण्याची शक्यता जाणवते. स्वभाव अति लहरी व विक्षिप्त झाला असणेही संभवते. त्यामुळे त्यांचेकडून विचित्र, विक्षिप्त आचरण होत असावे, असेही वाटते. आपल्या फटकळ बोलण्यामुळे समोरच्या व्यक्तीचा नकळत अपमानही होत असेल. यामुळे या राशीच्या मंडळींच्या व्यवहारात न्यूनता येत असण्याची शक्यता आहे. तसेच ज्ञानातही कमीपणा असल्याचा अनुभव येत असला पाहिजे. चंचल, अस्थिर मनस्थितीमुळे या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत बाधा येणे शक्य दिसते. तसेच या राशीच्या मंडळींच्या संसारसुखातही बाधा येत असल्याचे जाणवते. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या मंगळ ग्रहामुळे अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. काहींना उष्णताविकाराचा आजार त्रस्त करील; तर काहींना मूळव्याधीचा त्रास सहन करावा लागेल. काहींना शारीरिक-मानसिक कष्ट होतील. सतत सावधानतेने चाला. अपघात भय असून हाडमोड होणे संभवते. तसेच पाण्यापासून व विजेपासून धोका आहे. जपा. पण याच स्थानी गुरु ग्रह असल्यामुळे ज्यांच्या जन्म कुंडलीत योग आहे अशापैकी काहींना अचानक धनलाभ किंवा वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते. महिन्याच्या पूर्वार्धात मानसिक व कौटुंबिक सुख समाधान लाभेल; पण उत्तरार्धात मतभेद, वाद, गैरसमज होणे संभवते. तसेच शक्यतो प्रवास करू नका. प्रवासात मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. या राशीच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल होईल. पूर्वार्धात मानसिक ताण, विरोध, अनारोग्य यांचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात रवि-शनि एकत्र असल्यामुळे काही क्रांतिकारक फलदायी घटना घडण्याची शक्यता दिसते. या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे मानसिक व्यग्रता व नैराश्य येणे संभवते. पण हाच नेपच्यून गुप्त पोलीस असणारांना अनुकुल होईल. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना मन:शांती देईल. दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा.

=====ooooo0ooooo=====